26 DEC 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षक-विद्यार्थ्यांत आत्मीयतेची गरज

## एम. के. गोंधळी; जयसिंगपुरात अर्थशास्त्र अधिवेशनाचा समारोप

**जयसिंगपूर : प्रतिनिधी**

शिक्षक हा ज्ञान रचनावादी असावा. आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढवून स्वत:स सिद्ध करावे. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात आत्मीयता असणे गरजेचे असते. समाजातील सर्व घटकांमध्ये अर्थशास्त्राचा समावेश असतो. त्यामुळे वेगळेपण समृद्ध होते, असे प्रतिपादन कोल्हापूर विभागीय शिक्षण उपसंचालक एम. के. गोंधळी यांनी केले.

जयसिंगपूर महाविद्यालयात झालेल्या कोल्हापूर व कोकण विभागीय अर्थशास्त्र विचार मंचच्या १८व्या वार्षिक अधिवेशनाच्या सांगता कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे होते.



**जयसिंगपूर : एम.के.गोंधळी बोलताना. शेजारी प्राचार्य डॉ.बी.एम. राठोर, डॉ.पी.एस.कांबळे व इतर.**

डॉ. कांबळे म्हणाले, आज पाण्याचे संवर्धन करणे काळाजी गरज बनली आहे. जलसंपत्तीचा विवेकी वापर करणे गरजेचे आहे असे सांगून नोटाबंदीचा कोणताही परिणाम देशाच्या आर्थिक प्रगतीवर झालेला नाही. त्यामधून कोणताही उद्देश साध्य झालेला दिसून येत नाही तर जीएसटी हा प्रगत देशांनी सुचविलेला कर आहे. तो भारतात लागू होणे अडचणीचे ठरल्याचे ते म्हणाले. डॉ. धवलकुमार पाटील यांनी मनोगतात समाजाला वाचविण्याची ताकद ही अर्थशास्त्रामध्ये असते. स्वागत, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बी. एम. राडोर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. शरद शेटे व प्रा.व्ही.व्ही.जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एस.डी. चौगुले व प्रा. सौ. ए. ए. चौगुले यांनी केले. आभार उपप्राचार्या सौ. एस. जी. काटे यांनी मानले. यावेळी दोन दिवसीय दुर्मीळ नाण्यांचे प्रदर्शन भरविणाऱ्या प्रा. मधुकर तोडकर यांचा सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

ोळा



दत्तात्रय कोडाम, प्रतिभानगर, कोल्हापूर